

# बायबल

(निवडक कथा)

कल्पना कोठारे

परी प्रकाशन

**बायबल (निवडक कथा)**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १००/-

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | जग देवाचे | ५ |
| २. | उद्यानातील सर्प | ७ |
| ३. | केन आणि एबल् | ९ |
| ४. | नोहा आणि त्याची आर्क | ११ |
| ५. | बॅबल्‌चा मनोरा | १३ |
| ६. | सगळ्यात वाईट शिक्षा | १५ |
| ७. | मोझेस् व दहा आज्ञा | १८ |
| ८. | देवाचा मित्र अब्राहम | २० |
| ९. | रेबेकाचा विवाह | २३ |
| १०. | जेकब्‌ची गोष्ट | २५ |
| ११. | जोसेफ व त्याची विचित्र स्वप्ने | २८ |
| १२. | बोलणारी गाढवीण | ३० |
| १३. | नवीन नेता जेशुआ | ३२ |
| १४. | जेरिकोचे पतन | ३४ |
| १५. | गिडिअनची गोष्ट | ३६ |
| १६. | पराक्रमी सॅमसन | ३८ |
| १७. | रूथची कथा | ४१ |
| १८. | प्रेषित जोनह | ४३ |
| १९. | देवाचा पुत्र सॅम्युअल | ४५ |
| २०. | धनगर राजा डेव्हिड | ४७ |
| २१. | वेडा राजा सॉल | ४९ |
| २२. | राजा सॉलोमन् व शेबाची राणी | ५१ |
| २३. | भविष्यवेत्ता एलिजाह | ५३ |
| २४. | जरमिह आणि जेरूसलेमचा पाडाव | ५५ |
| २५. | महाराजा नेब्यूछंदनेझारचे स्वप्न | ५८ |
| २६. | भडकलेली भट्टी | ६० |
| २७. | सिंहाच्या गुहेत डॅनिअल | ६२ |
| २८. | एस्थरची गोष्ट | ६४ |

| | | |
|---|---|---|
| २९. | जीझस्‌ची जन्मकथा | ६७ |
| ३०. | हरवलेला मुलगा | ६९ |
| ३१. | जीझस्‌चा शुद्धिस्नानविधी | ७१ |
| ३२. | चुकलेले कोकरू | ७३ |
| ३३. | चांगला सॅमारिटन् | ७५ |
| ३४. | जंगलातील जीझस् | ७७ |
| ३५. | अधिकाधिक द्राक्षे तोडणाऱ्यांची गोष्ट | ७९ |
| ३६. | जीझस्‌ने घडविलेले चमत्कार | ८१ |
| ३७. | जीझस्‌चे अनुयायी | ९५ |
| ३८. | दिव्य तेजाचा दृष्टिलाभ | ९७ |
| ३९. | जॉन द बाप्टिस्टची गोष्ट | ९९ |
| ४०. | उधळ्या मुलाची गोष्ट | १०१ |
| ४१. | दहा मुली व विवाहोत्सव | १०३ |
| ४२. | मुलांचा मित्र जीझस् | १०४ |
| ४३. | लाझारस्‌चा पुनर्जन्म | १०६ |
| ४४. | पैसे खाणारे व्यापारी व जीझस् | १०८ |
| ४५. | विधवेची तांब्याची नाणी | १०९ |
| ४६. | मेरीची भक्ती | ११० |
| ४७. | सिलॉमचे तळे | ११२ |
| ४८. | बाथेस्डाचे तळे | ११३ |
| ४९. | ईस्टरची कथा | ११४ |
| ५०. | अखेरचे जेवण | ११६ |
| ५१. | विद्रोह | ११७ |
| ५२. | सुळावरील ख्राइस्ट | ११९ |
| ५३. | पुनरुत्थान | १२१ |
| ५४. | परत जिवंत झालेला जीझस् | १२२ |
| ५५. | उदय | १२५ |
| ५६. | प्रार्थना | १२७ |
| ५७. | पीटरची गोष्ट | १२८ |
| ५८. | बंदिवान पॉल | १३२ |



# जग देवाचे

'बायबल' याला 'जेनेसिस्' असेही म्हणतात. याचा अर्थ प्रारंभ! अगदी प्रारंभापासूनच्या कथा सांगणारा बायबल हा जुना ग्रंथ आहे. देवानेच हा प्रारंभ–सुरुवात केली. देव हा सृष्टीनिर्माता आहे. आकाश, जमीन, काळवेळ, पाणी, वृक्षवल्ली, पशुपक्षी, ग्रह,चंद्र, तारे, स्त्री – पुरुष, जलचर, प्राणी हे सर्व निर्माण केल्यानंतर सर्वांनी एकोप्याने राहून जीवनानंद लुटावा, असेच देवाला वाटत होते.

सर्वप्रथम देवाने, अगदी पहिल्या दिवशी ही पृथ्वी तयार केली.विशेष आकार नसलेल्या या पृथ्वीवर प्रथम कोणीच राहात नव्हते.

सर्वत्र अंधार दाटलेला होता. पृथ्वी सुंदर दिसावी म्हणून देव म्हणाला, ''प्रकाश येऊ दे !'' आणि प्रकाश पडला. उजळून निघालेल्या पृथ्वीकडे पाहताना देवाने उजेड व अंधार यांची विभागणी केली. 'दिवस' व 'रात्र' या दोन भागात 'संध्याकाळ' अलगद बसविली. प्रकाशाच्या आगमनाने जीवनाची सुरुवातच देवाने केली.

दुसऱ्या दिवशी देवाने आभाळ निर्माण केले व पाणी तयार झाले. पाण्याचे विभाजन करून त्याने वरील आभाळास 'स्वर्ग' हे नाव दिले.

तिसऱ्या दिवशी देव म्हणाला, ''स्वर्गाखालील पाणी एकत्र यावे व कोरडी जमीन वेगळी व्हावी.''

सुक्या जमिनीस 'भूमी' हे नाव देवाने दिले व पाण्याला 'सागर' हे नाव ठेवले. मग तो म्हणाला, ''भूमीवर गवत यावे, झाडे बिया व फळांनी लगडावीत ! देवाच्या इच्छेचे भूमीने पालन केले.

चौथ्या दिवशी देव म्हणाला, ''दिवस व रात्र वेगवेगळे वाटावेत म्हणून आकाशात प्रकाशदीप येऊ दे.'' पृथ्वीचे दिवे म्हणून सूर्य, चंद्र व तारे आकाशात तळपू लागले.


पाचव्या दिवशी देव म्हणाला, ''पाण्यात जलचर प्राणी, व आकाशात पक्षी निर्माण होवोत!'' अनेकविध माशांनी समुद्र व विविधरंगी पक्ष्यांनी आभाळ भरून गेले.

सहाव्या दिवशी देव म्हणाला, ''पृथ्वीवर प्राणी व सरपटणारे प्राणी निर्माण होवोत.'' अनेक प्रकारची जनावरे, पशू व सरपटणारे प्राणी फिरू लागले.

पृथ्वी छान दिसू लागली. मग देवाने स्वत:प्रमाणे दिसणारा मानव 'ॲडम्' व पहिली स्त्री 'ईव्ह' तयार करून त्यांना एडन्‌चया सुंदर बागेत ठेवले.

इतरांप्रमाणेच त्या दोघांनाही देवाने आशीर्वाद दिला, ''संख्येने वाढत राहा आणि सर्वांच्या उपयोगी पडा. समुद्रातील जलचर, जमिनीवरील पशू व आकाशातील पक्षी यांच्यावर तुमचीच सत्ता असेल.''

देव पुढे म्हणाला, ''या भूमीवरील बीजे, फळे आणि वृक्ष तुम्हास अन्न देतील. गवत आणि वृक्ष हे पशुपक्षी आणि सरपटणाऱ्या प्राण्यांचे अन्न असेल.'' याप्रमाणे देवाने निर्मिलेली प्रत्येक वस्तू उत्तम होती.



संपूर्ण सहा दिवसांच्या श्रमानंतर देवाला विश्वनिर्मितीचा आनंद मिळाल्यानंतर या सुंदर सृष्टीकडे पाहताना त्याला विश्रांतीची आवश्यकता भासली. सातव्या दिवशी देवाने निर्मितीचे काम थांबविले.

म्हणूनच या दिवसाला 'विश्रांतीचा पवित्र दिवस' असा त्याचा आशीर्वाद आहे. कष्टकऱ्यांचा आजही तो विश्रांती दिन आहे – रविवार !

✦✦



# उद्यानातील सर्प

देवाने निर्मिलेल्या प्राण्यांत, साप हा सर्वात धूर्त प्राणी होय.


एके दिवशी हा साप, ॲडम् व ईव्ह राहात असलेल्या उद्यानात शिरला. ईव्हजवळ जाऊन या सापाने तिला एका मोहमयी झाडाची फळे खाण्यास प्रवृत्त केले. वास्तविक 'इतर झाडांची फळे खा परंतु या झाडापासून दूर राहा' अशी देवाची आज्ञा होती. त्या झाडाची फळे खाल्ल्यास मृत्यू ओढवेल असेही देवाने सांगितलेले होते.

परंतु सापाने ईव्हच्या मनात देवाविषयी विष कालविले, ''तुम्ही देवाप्रमाणे अमर होऊ नये म्हणून त्या झाडाची फळे तुम्हास खाण्यास मज्जाव आहे'' असे सापाने ईव्हला सांगितले. त्या रसभऱ्या आकर्षक फळांचा मोह न आवरून, तिने एक फळ खाल्ले व ॲडम्लाही दिले.

फळ खाताच एकमेकांच्या नग्नतेची जाणीव प्रथमच त्यांना झाली. अंजिराच्या पानाने देह झाकण्याचा ते प्रयत्न करू लागले. देवाची आज्ञा मोडल्याने ते देवापासून लपू लागले. देव रागावताच ॲडम्ने ईव्हला व ईव्हने त्या सापास दोष देण्यास सुरुवात केली.

देवाने त्या तिघांनाही शिक्षा ठोठावली. सापास मातीत लोळण्याची व चेपून मरण्याची शिक्षा दिली गेली. ईव्हला, प्रसववेदनांचा व पुरुषाची गुलाम बनून राहण्याचा

शाप दिला गेला. तर ॲडमला उदरनिर्वाहासाठी जन्मभर जमिनीतील काट्याकुट्यात राबून अन्नधान्य पिकविण्याची सजा देण्यात आली.



नंतर देवाने त्यांना एडनच्या सुंदर बागेतून खाली जमिनीवर टाकले चामड्यांची वस्त्रे त्यांना पुरविण्यात आली. मात्र त्या अमर वृक्षाची फळे त्यांना कधीच मिळणार नाहीत याची देवाने काळजी घेतली. अशा तऱ्हेने एडन् गार्डन म्हणजेच स्वर्गातील त्या नंदवनास मानवजात, कायमची मुकली.

✦✦



# केन आणि एबल्

अॅडम् व ईव्ह या आदिमानव व स्त्रीस दोन पुत्ररत्ने प्राप्त झाली. केन हे जगातील सर्वात पहिले बाळ होय. नंतर एबल्चा जन्म झाला. केन हा शेतकरी बनला तर एबल् हा धनगर झाला.


एके दिवशी केनने काही कणसे व फळे देवांसाठी नजराणा म्हणून आणली. एबल्ने त्याच्या कळपातील प्रथम जन्मलेले धष्टपुष्ट कोकरू देवाला वाहण्यासाठी आणले. केनने आणलेली भेट राजीखुशीने आणलेली नव्हती व उत्तमही नव्हती. याउलट एबल्च्या भेटीमागील अर्पणभाव खरा होता त्यामुळे देव एबल्वर प्रसन्न झाला.

केनला या गोष्टीचा खूप राग आला. ''तू राग न मानता चांगला हो. पापाचा धनी बनू नकोस.'' असे देवाने केनला सांगितले. परंतु त्याने देवाच्या सूचनेकडे दुर्लक्षच केले. तो भावास पाण्यात पाहू लागला व एके दिवशी त्याने भावाची हत्या केली.

देवाने ''तुझा भाऊ कोठे आहे ?'' असा प्रश्न केनला केला तेव्हा ''मी काही माझ्या भावाचा रक्षक नाही'' असे उद्धट उत्तर त्याने दिले.

तेव्हा देवाने त्याला शाप दिला, ''तुला जमिनीच्या लागवडीतून फळे व कणसे मिळणार नाहीत. यापुढे तू एखाद्या पळपुट्यासारखा भटकत जगशील''

देवाच्या त्या कठोर शिक्षेमुळे हताश होऊन केन रडू-ओरडू लागला. अखेर देवाला त्याची दया आली व 'यास कोणी मारू नये' अशी खूण केनवर करून देवाने त्याला सोडून



दिले. नंतर केनने देवाचा निरोप घेतला व अति पूर्वेकडे जाऊन तो 'नॉडन्' नावाच्या देशी स्थाईक झाला. तेथे त्याने एका महिलेशी विवाह केला व त्याला 'इनॉक' नावाचे पुत्ररत्न प्राप्त झाले. पुढे त्याच नावाचे शहरही त्याने वसविले.

मध्यंतरात ईव्हने एका तिसऱ्या पुत्रास जन्म दिला. त्याला ती 'सेठ' या नावाने संबोधित असे. कारण देवाने 'एबल्च्या' बदल्यात तिला हा मुलगा दिला होता. ॲडम् वृद्ध होईतो ईव्हने त्याला बरीच मुले दिली. अशा तऱ्हेने मानव वृद्धिंगत होत गेले. ते सर्व ॲडम् व ईव्हचेच वंशज होत.

✦✦

